दै. प्रहार. १०/१२/२०१५.

# पर्यावरण संवर्धनासाठी तरूणांनी संस्कृती अभ्यासावी : गोवा पर्यावरण मंत्री राजेंद्र आर्लेकर

## केर येथे रा. से. यो.च्या विद्यापीठस्तरीय विशेष निवासी शिबीराचे उद्घाटन

▶दोडामार्ग (प्रतिनिधी)

जागतिक तापमानवाढीमुळे जग जळत आहे. पृथ्वीवरील संपूर्ण सजीवसृष्टी धोक्यात आली आहे. पर्यावरणाच्या असंतुलनामुळे दुष्काळ, गारपीट, अतिवृष्टी यांसारख्या भयानक संकटांना थांबवायचे असल्यास तरूणांनी पुढाकार घेऊन पर्यावरण संवर्धनाच्या विविध उपाययोजना राबवाव्यात. केवळ चार भिंतीच्या आत राहून पुस्तकी पर्यावरण न शिकता आपल्या संस्कृतीचा अभ्यास करावा. संस्कृतीनेच आपल्याला पर्यावरण संवर्धन शिकविले आहे, असे प्रतिपादन गोवा राज्याचे वन, पर्यावरण व पंचायत मंत्री राजेंद्र आर्लेकर यांनी केले.

ते येथील मुंबई विद्यापीठ सेवा- योजना विभाग व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने केर येथे आयोजित केलेल्या सात दिवसीय विद्यापीठ स्तरीय विशेष निवासी शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुंबई विद्यापीठ महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. अनिल पाटील, मुंबई विद्यापीठ रा. से. यो. चे कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एस. बिडवे, केर-भेकुर्ली ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच प्रेमानंद देसाई, संस्थेचे सचिव मोहन खातू, सदस्य भाई परमेकर प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये होते.

पर्यावरण संवर्धन ही मध्यवर्ती कल्पना डोळ्यासमोर ठेवून हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. आपल्या मार्गदर्शनपर



विद्यापिठस्तरीय निवासी शिबीरात बोलताना गोवा राज्याचे पर्यावरण मंत्री ना. आर्लेकर (छाया- तेजस देसाई)

भाषणात श्री. आर्लेकर पुढे म्हणाले की, तरूणाई ही अशी शक्ती आहे की ते काहीही करू शकतात. भारतात आज ६० % तरूण आहेत. यांच्या आधारावर आपण कोणतीही बाजी सहज मारू शकतो. फक्त त्यासाठी तरूणांनी एकत्र येण्याची गरज आहे. प्रत्येकामध्ये सामाजिक बांधीलकीची भावना निर्माण झाली पाहीजे. केवळ मार्कवान न होता गुणवान बना. आदर्श नागरिक बना. यासाठी हे शिबीर तुम्हाला निती मूल्य, शिकवेल. ही सारी शिदोरी आयुष्यभर पुरेल त्यासाठी संस्कृतीच्या जवळ जा तिला समजाऊन घ्या आपोआप पर्यावरणाचे संवर्धन होईल.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रमुख पाहुणे डॉ. अनिल पाटील यांनीही स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. एन. एस. एस. चे खरे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांनी खेड्यात जाऊन तेथील जीवन समजावून घेणे व आजुबाजुच्या साधन- सामुग्रीचा योग्य वापर करून उत्पन्न कसे घ्यावे हे विद्यार्थ्यांनी स्वतः शिकावे आणि त्याचा प्रचार व प्रसार करावा हे आहे. एक आदर्श विद्यार्थी कसा बनेल, व्यक्तीमत्व विकास कसा करता येईल हे यांसारख्या शिबिरातून शिकायला भेटते, असे ते म्हणाले. गावचे सरपंच प्रेमानंद देसाई यांनी यावेळी गावात राबविलेल्या विविध योजना तसेच गावाला मिळालेल्या विविध पुरस्कारांची माहीती दिली. प्रा. बिडवे यांनीही आपल्या मनोगतातून पर्यावरण संवर्धनाचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेटये आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की प्राचीन संस्कृती आपणास उर्जा देण्याचे काम करते ती आपल्याला पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा देते. यावेळी त्यांच्या हस्ते मा. आर्लेकर, डॉ. अनिल पाटील प्रा. बी. एस बिडवे, प्रेमानंद देसाई यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. या शिबीरास मुंबई, पालघर, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध महाविद्यालये १०० स्वयंसेवक उपस्थित होते. तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ, संस्थेचे पदाधिकारी, जिल्हा कार्यक्रम समन्वयक, डॉ. कोलवाल व प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी रा. से. यो. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. ए. मोरे व डॉ. एस. यु. दरेकर तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी , सूत्र संचालन प्रा. सोपान जाधव, तर आभार प्रा. आर. ए. मोरे यांनी केले.